## प्रेसनोट दिनांक १९/०१/२०१८

## परिमंडळ ४ मधील वाहन चोरी विरुध्दच्या मोहिमेला प्रचंड यश

पुणे शहरात विशेषतः हडपसर, कोंढवा, वानवडी परिसरात मोठया प्रमाणावर दुचाकी वाहने चोरीस जात होती. वाढती लोकसंख्या व अपुरे मनुष्यबळ यामुळे या वाहनचो-यांवर नियंत्रण ठेवणे अतिशय कठीण झाले होते.

मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर, श्रीमती रश्मी शुक्ला मॅडम व मा.पोलीस सह आयुक्त श्री. रविंद्र कदम सो., यांनी केलेले मार्गदर्शन व पोलीस आयुक्तांनी दिलेल्या प्रेरणा आणि प्रोत्साहनामुळे पोलीस उप आयुक्त परि. ४, श्री दिपक साकोरे सो. यांनी मा. अप्पर पोलीस आयुक्त सो., (उत्तर विभाग) श्री प्रदिप देशपांडे सो. यांचे बरोबर चर्चा करुन व मार्गदर्शन घेवुन एक अभिनव कल्पना परि.-४, अंतर्गत राबविली. सदर योजनेचे दोन भाग करण्यात आले. त्यामध्ये गुन्हयास प्रतिबंध करण्याकरीता त्रिस्तरीय योजना ज्यामध्ये १) फिक्स पॉइंट, २) नाकाबंदी व ३) दुचाकी वाहनावरुन वाढीव गस्त अशी उपाययोजना करण्यात आली. तसेच वाहन चोरी गुन्हे अन्वेषणाकरीता वानवडी विभागाचे सहा. पोलीस आयुक्त श्री मिलींद पाटील सो. यांचे प्रत्यक्ष देखरेखीखाली पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, सहा. पोलीस निरीक्षक संदिप देशमाने, प्रसाद लोणारे, पोलीस उपनिरीक्षक मंगेश भांगे, रविंद्र बागुल, विशाल मोहिते, गणेश कुलाळ यांचे नेतृत्वाखाली ४ पथके स्थापन करण्यात आली. वाहन चोरीच्या गुन्हयांचा अभ्यास करुन नियोजनबध्द आराखडा तयार करण्यात आला व सदर पथके पुणे शहराच्या लगतच्या भागात व इतर जिल्हयात रवाना करण्यात आली. या पथकांनी आष्टी, जामखेड, राशीन, कर्जत, पाटस, यवत, कुरकुंभ, दौड, काष्टी, श्रीगोंदा, चाकण, खेड, सासवड, जेजुरी, लोणंद या भागात गोपनीय माहिती व वाहनचोरी तक्रार ॲप चा सुयोग्य वापर करुन खालील नमुद आरोपींना ताब्यात घेवुन त्यांचेकडे सखोल तपास करुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणले. सदर आरोपींची नावे खालील प्रमाणे

१) सिराज नजीर शेख वय २३ वर्षे रा.मु.पो.दुरगाव, मुस्लीम वस्ती ता. कर्जत, जि. अहमदनगर,
२) अकील गफार सय्यद वय २४ वर्षे रा. मु. पो. राशीन,गल्ली काझी नं. ४ ता. कर्जत जि. अहमदनगर
३) श्रीकांत बबन पोटरे वय ३२ वर्षे रा. लोहार गल्ली कर्जत जि. अहमदनगर
४) संतोष शंकर डांगे वय २६ वर्षे रा. लोणी व्यंकना ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर
५) मनोज अर्जुन होले वय २५ वर्षे रा. पाटस ता. दौंड जि. पुणे.
६) ओंकार नामदेव शितोळे वय १९ वर्षे रा. पाटस ता. दौंड जि. पुणे.

**वाहन चोरीचे खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.**

**हडपसर पोलीस स्टेशन ०५ गुन्हे, बारामती पोलीस स्टेशन ०१ गुन्हा, चाकण पोलीस स्टेशन ०१ गुन्हा, येरमाळा पोलीस स्टेशन उस्मानाबाद ०१ गुन्हा, टेंभुर्णी पोलीस स्टेशन सोलापूर ०१ गुन्हा, लोणीकंद पोलीस स्टेशन ०१ गुन्हा, दौंड पोलीस स्टेशन ०१ गुन्हा**

**अशाप्रकारे या वाहन चोरी अन्वेषण पथकांनी भरीव कामगिरी करुन एकुण ३२ वाहने अंदाजे ६,५०,०००/-रु. किंमतीची ताब्यात घेतली व वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणले.** त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. सदर मोहिम यापुढेही अशाच पध्दतीने राबविण्यात येणार आहे.

वाहन चोरी अन्वेषण विशेष पथकातील सहा. पोलीस निरीक्षक, संदिप नारायण देशमाने, सहा. पोलीस निरीक्षक, प्रसाद लोणारे, पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, रविंद्र बागुल, विशाल मोहिते, गणेश कुलाळ, पोलीस हवालदार युसुफ पठाण, राजेश नवले, पो.ना. प्रमोद टिळेकर, गणेश दळवी, प्रताप गायकवाड, सैदोबा भोजराव, विनोद शिवले, देवीकर, ज्ञानेश्वर गिरमकर, पांडूळे, सुजय कोलगे, चेतन गायकवाड, पो.शि. नितीन मुंढे, अमित कांबळे, अकबर शेख, दाऊद सय्यद, कैलास माळकर, मोरे, नाडे, दुशिंग यांनी वरील कामगीरी केली.